
दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ
बीड महाराष्ट्र | गुरुवार, 30 एप्रिल 2026 | अंक क्र. 339 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4




Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

# मुंडे पॅनेलची विजयी हॅट्ट्रिक!

सिरसाळा पुन्हा ताब्यात, तर जळगव्हाण-मरळवाडीत विरोधक चितपट!

**परळी तालुक्यातील पोटनिवडणुकीत धनंजय मुंडेंचे एकहाती वर्चस्व**

**मरळवाडीत आंधळे परिवाराचा वारसा कायम, तर जळगव्हाण आणि सिरसाळ्यात 'जगमित्र'चा डंका!**





■ परळी वैद्यनाथ (नितीन ढाकणे)

राज्यातील ग्रामपंचायत पोटनिवडणुकीचे निकाल आज जाहीर झाले असून, परळी तालुक्यात माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी आपले राजकीय वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. तालुक्यातील अत्यंत प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या तिन्ही ग्रामपंचायत पोटनिवडणुकीत मुंडे समर्थकांनी एकहाती विजय मिळवत विरोधकांना धोबीपछाड दिली आहे.

## सिरसाळ्यात 'नसीब' जोरात; मोठ्या फरकाने विजय

■ तालुक्यातील मोठी आणि राजकीयदृष्ट्या महत्त्वाची मानल्या जाणाऱ्या सिरसाळा ग्रामपंचायत सरपंचपदाच्या निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागले होते. येथे आ. धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखालील पॅनेलचे उमेदवार शेख नसीब शेख रहीम यांनी प्रतिस्पर्ध्याचा मोठ्या मताधिक्याने पराभव केला. या विजयानंतर नवनिर्वाचित सरपंच आणि त्यांच्या समर्थकांनी परळीतील 'जगमित्र' कार्यालयात जाऊन स्व. पंडित अण्णा मुंडे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करत जल्लोष साजरा केला.

## जळगव्हाण आणि मरळवाडीतही वर्चस्व कायम

■ जळगव्हाण ग्रामपंचायतीमध्ये संदीप वसंतराव चव्हाण यांनी सरपंचपदी बाजी मारली आहे. तर मरळवाडी येथे मयत सरपंच बापू आंधळे यांच्या पत्नी श्रीमती दीपाली बापुराव आंधळे यांनी विजय मिळवून आपल्या पतीचा वारसा पुढे नेला आहे. या दोन्ही ठिकाणच्या विजयामुळे आ. धनंजय मुंडे यांनी ग्रामीण भागावरील आपली पकड अधिक मजबूत असल्याचे दाखवून दिले आहे.

### विजयानंतर 'जगमित्र'वर जल्लोष

निकाल जाहीर होताच तिन्ही ग्रामपंचायतींचे नवनिर्वाचित सरपंच आणि शेकडो कार्यकर्ते परळीत दाखल झाले. यावेळी फटाक्यांची आतषबाजी आणि गुलालाची उधळण करत कार्यकर्त्यांनी परिसर दणाणून सोडला. सिरसाळा, जळगव्हाण आणि मरळवाडी येथील सर्व नवनिर्वाचित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आ. धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत आगामी काळात गावाच्या विकासासाठी कटिबद्ध राहण्याची ग्वाही दिली.

**सिरसाळ्यात 'नसीब' जोरात! 'जगमित्र'चा डंका!**



■ यावेळी सिरसाळा ग्रामपंचायत नवनिर्वाचित सरपंच शेख नसीब शेख रहीम, माजी सरपंच फिरोज पठाण, ग्रामपंचायत सदस्य शेख नय्युम, शेख रफिक, अक्रम पठाण, सलमान पठाण, माजी सरपंच इम्रान पठाण, उपसरपंच सुलतान पठाण, मोहम्मद इनामदार, गुड्डू पठाण, मुस्लिम संघाचे जिल्हाध्यक्ष शिराज देशमुख, सिरसाळा सेवा सहकारी सोसायटी चेअरमन नदीम भाई, जावेद पत्रकार, अशोक गलांडे, तंटामुक्त अध्यक्ष गाव समिती सिरसाळा अयोसोद्दीन इनामदार, विद्यार्थी आघाडी बीड जिल्हा अध्यक्ष शेख राजू, इरफान बॉस, रफिक बागवान आदी उपस्थित होते.

■ त्याचबरोबर जळगव्हाण येथील नवनिर्वाचित सरपंच संदीप वसंतराव चव्हाण यांसह राजाभाऊ सपकाळ, सुभाष जाधव, अमोल जाधव, उद्धवराव जाधव, कैलास क्षीरसागर, प्रल्हाद पंडित, शिवाजी राठोड, लक्ष्मण चव्हाण, प्रकाश चव्हाण, रामजी चव्हाण, लक्ष्मण राठोड, विश्वनाथ आडे, उद्धव सोळंके यांसह आदी उपस्थित होते.

■ मरळवाडी चे मयत सरपंच बापू आंधळे यांच्या पत्नी व नवनिर्वाचित सरपंच श्रीमती दीपाली बापुराव आंधळे यांच्या सह उपसरपंच वाल्मीक आघाव, चेअरमन हनुमान आंधळे, त्र्यंबक फड, विष्णू आंधळे, बाळासाहेब फड, संतराम आंधळे, परमेश्वर फड, बापुराव फड, अश्रूबा आघाव, तुकाराम व्हावळे, शिवाजी फड यांसह पदाधिकारी आदींनी जगमित्र कार्यालयात उपस्थित राहून विजयाचा जल्लोष साजरा केला.



# आष्टी तालुक्यातील ग्रामपंचायत पोटनिवडणुकीत आ. सुरेश धस यांचे वर्चस्व

■ आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी तालुक्यात नुकत्याच पार पडलेल्या ग्रामपंचायत पोटनिवडणुकीत आमदार सुरेश धस यांच्या गटाने पुन्हा एकदा आपले वर्चस्व अधोरेखित केले आहे. तालुक्यातील विविध गावांमध्ये धस समर्थक उमेदवारांना मतदारांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत विजयी केले, त्यामुळे स्थानिक राजकारणात त्यांच्या गटाची मजबूत पकड कायम असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

सावरगाव घाट (मायंबा) येथील सरपंचपदासाठी झालेल्या निवडणुकीत सौ. मनिषा कैलास चंदनशिव यांनी तब्बल ७४ मतांनी दणदणीत विजय मिळवला. या विजयामुळे गावपातळीवर धस गटाचे संघटन आणि जनाधार अधिक बळकट झाल्याचे दिसून आले. तसेच सुलेमान देवळा ग्रामपंचायतीच्या सदस्यपदासाठी झालेल्या निवडणुकीत शिवम दिगंबर घोडके यांनी विजयी झाले आहे. या दोन्ही निकालांमुळे आष्टी तालुक्यात आमदार सुरेश धस यांच्या नेतृत्वावर मतदारांचा विश्वास कायम असल्याचे अधोरेखित झाले आहे. या विजयानंतर आमदार सुरेश धस यांनी अभिनंदन केले. मराठवाडा भूषण लोकनेते आमदार सुरेश आण्णा धस प्रतिष्ठान'च्या वतीने विजयी उमेदवारांचा सत्कार करण्यात आला.

# परळीत कपड्याच्या मॉलला भीषण आग

## नगरपालिकेतील अग्निशामक विभागाचा गलथान कारभार चव्हाट्यावर!

■ परळी प्रतिनिधी

शहरातील अत्यंत गजबजलेल्या राणी लक्ष्मीबाई टावर परिसरातील 'रेझिंग' कपड्याच्या मॉलला लागलेल्या भीषण आगीने मॉलचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले असून, नगरपालिकेच्या अग्निशामक दलाच्या संथ कारभारावर आता नागरिक आणि लोकप्रतिनिधींनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. दिनांक 29 एप्रिल रोजी, दुपारी अचानक मॉलमध्ये धूर दिसू लागला आणि काही वेळातच आगीने रौद्र रूप धारण केले. विशेष म्हणजे, नगरपालिका कार्यालय घटनास्थळापासून अवघ्या काही मीटर अंतरावर असूनही, अग्निशामक दलाची गाडी पोहोचायला तब्बल ४० ते ५० मिनिटे लागली. गाडी येण्यास विलंब होत असल्याचे पाहून स्थानिक नागरिक आणि कर्मचाऱ्यांनी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता उपलब्ध साधनांनी आग विझवण्याचा प्रयत्न केला. या घटनेची माहिती मिळताच शिवसेना (शिंदे गट) नगरसेवक व्यंकटेश शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार पक्ष) नगरसेवक नितीन बागवाले यांनी घटनास्थळी धाव घेतली. ''जर अग्निशामक दल वेळेवर आले असते, तर इतके मोठे नुकसान टळले असते, प्रशासनाने आपल्या कारभारावर विचार करावा असा थेट आरोप करत त्यांनी उपस्थित कर्मचाऱ्यांना धारेवर धरले.


■ नगरसेवक व्यंकटेश शिंदे आणि नितीन बागवाले यांनी प्रशासनाला धरले धारेवर विचारला जाब.
■ अग्निशामक दलाचा 'वेळकाढूपणा': मॉल मधील लाखोंचे नुकसान- कर्मचारी आणि नागरिकांच्या मदतीने आगीवर नियंत्रण.
■ 'रेझिंग' मॉलचे प्रचंड नुकसान आपत्ती व्यवस्थापनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह?
■ 40 ते 50 मिनिटे उशिरा पोहोचली अग्निशमन गाडी परळीतील राणी लक्ष्मीबाई टावर परिसरातील घटना











## संपादकीय

# उष्माघाताचे संकट!

यंदाचा उन्हाळा केवळ घामाच्या धारा काढणारा नसून अंगाची लाहीलाही करणारा आणि जीवघेणा ठरू लागला आहे. महाराष्ट्रासह संपूर्ण देश सध्या एका भीषण नैसर्गिक संकटाचा सामना करत असून, तापमानाने चाळिशी केव्हाच ओलांडून आता ४७ अंशांच्या दिशेने कूच केली आहे.

महाराष्ट्रातच नव्हे तर देशातील काही भागांतील नागरिकांना एका भीषण नैसर्गिक संकटाचा सामना करावा लागत आहे. अनेक राज्यांमध्ये तापमानाचा उच्चांक पाहायला मिळत असून, नागरिक निसर्गाच्या अत्यंत दाहक आणि भीषण संकटाशी सामना करत आहेत. वैशाख वणव्याची दाहकता एप्रिलमध्येच जाणवू लागली असून, ४५ अंशांच्या पार गेलेल्या तापमानामुळे आभाळातून पावसाऐवजी आगीच्या ज्वाळाच खाली येत आहेत की काय, अशी भीषण स्थिती निर्माण झाली आहे.

उत्तर प्रदेशातील बांदा येथे देशातील सर्वाधिक ४७.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली असून, उन्हाच्या तडाख्याने सीमा ओलांडली आहे. राजस्थान, पंजाब, हरियाणा, दिल्ली आणि मध्य प्रदेशासह पूर्व भारतातील पश्चिम बंगाल, बिहार आणि झारखंडमध्येही सूर्याचा प्रकोप जाणवत आहे. दक्षिण भारतात तेलंगणा, कर्नाटक, तामिळनाडू आणि आंध्र प्रदेशात उष्णतेच्या लाटेने धोक्याची पातळी ओलांडली. ओडिशामध्येही उष्णतेने उच्चांक गाठला आहे. दुसऱ्या बाजूला जम्मू-काश्मीरसारख्या थंड प्रदेशातही तापमानाचा पारा चढलेला दिसत असून, ही स्थिती काळजाचा ठोका चुकवणारी आहे. राज्यात नेहमीप्रमाणे विदर्भातील अकोला, चंद्रपूर आणि नागपूर या जिल्ह्यांत उष्णतेने कहर आहे. विशेषतः अकोल्याचा पारा ४६.९ अंशांवर पोहोचल्याने हे शहर उष्ण शहरांच्या यादीत स्थान वरच्या स्थानी आहे. केवळ विदर्भच नव्हे, तर मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातही उष्णतेच्या लाटेने नागरिकांची लाहीलाही होत आहे. उष्णतेच्या लाटांचा भूगोल आता वेगाने बदलत असून, उत्तर भारताकडून ही आग मध्य आणि दक्षिण भारताकडे सरकली आहे. अगदी हिमालयाच्या कुशीतील जम्मू-काश्मीरही या आगीतून सुटलेले नाही. ही उष्णता आता केवळ घामाच्या धारा काढणारी उरली नसून ती थेट जीव घेण्यावर टपली आहे. परभणीपासून हिंगोलीपर्यंत आणि नगरपासून नागपूरपर्यंत सात-आठ जणांचा उष्माघातामुळे मृत्यू झाला आहे. शेतात राबणारा शेतकरी आणि कामासाठी पायपीट करणारा कष्टकरी आज या निसर्गनिर्मित संकटाचा बळी पडत आहे, हे विदारक सत्य आहे. पर्यावरण शास्त्रज्ञांच्या मते, ही दाहकता केवळ ऋतुचक्राचा भाग नसून 'हवामान बदलाचा' एक धोक्याचा इशारा आहे. वाढते सिमेंटचे जंगल आणि बेसुमार वृक्षतोडीमुळे निसर्गाचा समतोल ढासळला असून, जागतिक तापमान वाढीमुळे उष्णतेच्या लाटांची वारंवारता आणि तीव्रता दोन्ही आता नियंत्रणाबाहेर गेल्या आहेत. पूर्वी मे महिन्यात जाणवणारे उन्हाचे चटके आता मार्च-एप्रिलमध्येच अंगाची लाहीलाही करत आहेत. मार्च महिन्यातच तापमानाचा पारा ४० अंशांच्या पार जाणे, ही धोक्याची घंटा मानली जात होती. दिल्ली, उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये तर अनेक ठिकाणी तापमान ४७ - ४८ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले आहे. ज्यामुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे.

वाढत्या धोक्यामुळे सरकारकडून अनेक जिल्ह्यांत 'येलो अलर्ट' जारी केला आहे. उष्माघात हा या हवामान बदलाचा सर्वात घातक परिणाम आहे. वाढत्या उष्णतेमुळे शरीराची तापमान नियंत्रण प्रणाली कोलमडते, ज्यामुळे गंभीर आजार किंवा मृत्यू ओढवू शकतो. सरकारी आकडेवारीनुसार, गेल्या दशकात देशात उष्णतेमुळे हजारो नागरिकांना आपला जीव गमवावा लागला आहे. शेतमजूर, बांधकाम कामगार आणि रस्त्यावरील विक्रेते यांसारख्या उघड्यावर काम करणाऱ्या वर्गाला याचा सर्वाधिक फटका बसत आहे. उष्णतेचे हे संकट केवळ आरोग्यापुरते मर्यादित नाही. कडक उन्हामुळे शेतीतील पिकांचे नुकसान होत आहे, ज्यामुळे अन्नसुरक्षेचा प्रश्न निर्माण होतोय. तसेच, वाढत्या वीज वापरामुळे ऊर्जेची टंचाई निर्माण होऊन वीज कपात करावी लागत आहे. 'श्रम उत्पादकता' कमी झाल्यामुळे देशाच्या जीडीपीवरही याचा नकारात्मक परिणाम होत असल्याचे जागतिक अहवाल सांगतात. उष्णतेमुळे पिकांवर ताण येतो आणि पाण्याची मागणी वाढते. हिमालयातील बर्फ वितळण्याचे प्रमाण कमी झाल्यामुळे नद्यांच्या पाणीपुरवठ्यावरही परिणाम होत आहे. राज्यातील विदर्भात, विशेषतः अकोला येथे तापमान ४६.९° सेल्शिअसवर गेल्याने सध्या विदर्भ हा उष्माघाताचा 'हॉटस्पॉट' ठरला आहे. महाराष्ट्रात २०२६ च्या उन्हाळ्यात आतापर्यंत उष्माघातामुळे ७ ते ८ जणांचा मृत्यू झाल्याची नोंद आहे. परभणीत ३७ वर्षीय व्यक्तीचा उष्माघाताने मृत्यू झाला असून, अहिल्यानगरात ४५ वर्षीय महिला शेतकरी शेतात काम करताना दगावली. नागपूर जिल्ह्यात बसने प्रवास करणाऱ्या ६५ वर्षीय प्रवाशाचा मृत्यू झाला, अशी उदाहरणे देता येतील. उष्णतेच्या लाटांमुळे शरीरातील पाणी कमी होणे (डिहायड्रेशन), उष्माघात आणि मृत्यूच्या प्रमाणात वाढ झाली आहे. सध्याच्या परिस्थितीत स्वतःची काळजी घेणे, मुक्या प्राण्यांसाठी पाण्याची सोय करणे आणि ऊन टाळून कामे करणे, हेच आपल्या हातात आहे. आरोग्य विभागाने दुपारी घराबाहेर



न पडण्याचे, सुती कपडे वापरण्याचे आणि भरपूर पाणी पिण्याचे आवाहन केले आहे. मात्र, केवळ तात्पुरत्या उपाययोजनांनी हे संकट टळणारे नाही, हेही तितकेच महत्त्वाचे आहे. जागतिक तापमान वाढीमुळे पृथ्वीचे सरासरी तापमान वाढत आहे, ज्याचा थेट परिणाम भारताच्या उन्हाळ्यावर होत आहे. दुपारी १२ ते ४ या वेळेत रस्त्यावर शुकशुकाट पाहायला मिळत असल्याने अनेक शहरात 'अघोषित संचारबंदी' अनुभवला मिळत आहे. पॅसिफिक महासागरातील पाण्याच्या तापमानातील बदलांमुळे मान्सूनवर परिणाम होऊन उष्णतेची तीव्रता वाढली आहे. उष्माघाताचे संकट हे निसर्गाचे एक प्रकारची प्रतिक्रिया आहे. आपण निसर्गाचा जो समतोल बिघडवला आहे, त्याचे परिणाम आता आपण भोगत आहोत. जर आपण आताच कार्बन उत्सर्जन कमी करणे आणि निसर्ग संवर्धनाकडे लक्ष दिले नाही, तर भविष्यातील पिढ्यांसाठी हा उन्हाळा अधिक असह्य आणि प्राणघातक ठरेल.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीतेचे अनुकरण करून सर्वत्र वृक्षारोपण व्हावे.

**३० एप्रिल १९०९ रोजी अमरावती जिल्ह्यातील यावली येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा जन्म झाला त्यांचे मूळ नाव माणिक बंडोजी ठाकूर होते. जनुकाय एक चमकता तारा या पृथ्वीवर उदयास आला की काय असे वाटायला लागले.आपण पहातो की, कोणतेही युद्ध जिंकण्यासाठी शस्त्र आवश्यक असते यात तलवार,बंदुक, दारूगोळा किंवा इतर शस्त्रांचा वापर केला जातो.परंतु ईश्वराने जनुकाय इंग्रजांशी लढा देण्यासाठी व राष्ट्रहितासाठी तुकडोजी महाराजांना "खंजिरी" हे शस्त्र दिले की काय असे त्यावेळी सर्वांनाच वाटु लागले.खंजिरी दिसायला जरी छोटी असली तरी समाज प्रबोधनाच्या दृष्टीने आणि इंग्रजांच्या मानगुटीवर बसणारे तीक्ष्ण (धारदार)शस्त्र होते.**

तुकडोजी महाराजांनी (खंजिरी)या शस्त्राने एकाच वेळी दोन बाजू साध्य केल्या त्यामध्ये समाजातील भेदभाव दूर करून समाजात एकता व अखंडता प्रबोधनाच्या माध्यमातून निर्माण करून जनजागृती निर्माण केली आणि दुसरे अत्यंत महत्त्वाचे म्हणजे इंग्रजां विरूध्द लढा उभारण्यासाठी खंजिरीच्या माध्यमातून संपूर्ण जनता एकत्र येणे व स्वतंत्र लढा यशस्वी करणे हा मुख्य उद्देश तुकडोजी महाराजांचा होता आणि तो साध्य करून दाखविला.कारण त्याकाळी त्यांच्या खंजिरीचा आवाज संपूर्ण भारतात गुंजत होता अशा परिस्थितीत इंग्रजांमध्ये सुध्दा भितीचे वातावरण निर्माण झाले होते.यावरून स्पष्ट होते तुकडोजी महाराजांच्या खंजिरीने इंग्रजांची झोप उडाली व धाबे दणाणून सोडले होते.कारण त्याकाळी तुकडोजी महाराजांनी खंजिरीच्या बळावर संपूर्ण देश एकत्र करून स्वतंत्र संग्रामाची जोत प्रज्वलित करण्याचे महान कार्य केले आणि खंजिरीच्या माध्यमातून प्रबोधन देवून स्वतंत्र लढा उभारण्यासाठी तुकडोजी महाराजांनी लाखमोलाची कामगिरी केली.खंजिरीच्या माध्यमातून भजन, कीर्तन, प्रवचन करून समाजामध्ये जनजागृती निर्माण करून समाजात बंधुभाव निर्माण व्हावा आणि इंग्रजांविरूध्द लढण्यासाठी संपूर्ण समाजबांधव एकत्रित करून खंजिरीच्या माध्यमातून इंग्रजांना धारेवर धरले आणि समाजात जनजागृती निर्माण केली.तुकडोजी महाराजांचे महान कार्य पाहून संपूर्ण देश आश्चर्यचकित झाला.अशा परिस्थितीत त्यांच्या सामाजिक, आध्यात्मिक आणि राष्ट्रीय कार्याची दखल घेऊन तुकडोजी महाराजांना 'राष्ट्रसंत' ही पदवी भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी बहाल केली होती. त्यांनी स्वातंत्र्यलढ्यात दिलेले योगदान, 'ग्रामगीता' ग्रंथातून दिलेला सामाजिक संदेश आजही समाजात प्रभावी आहेत.खंजिरी भजनाच्या माध्यमातून त्यांनी अंधश्रद्धा निर्मूलन, ग्रामविकास आणि राष्ट्रीय एकात्मतेसाठी मोठे योगदान दिले. आत्मसंयमनाचे विचार त्यांनी ग्रामगीता या काव्यातून मांडले. त्यांनी मराठी व हिंदी भाषांमध्ये काव्यरचना केली आहे. तुकडोजी महाराजांनी १९३५ साली मोझरी येथे गुरुकुंज आश्रमाची स्थापना केली. खंजिरी भजन हा प्रकार त्यांच्या प्रबोधनाचे वैशिष्ट्य होते.तुकडोजी महाराज हे आधुनिक काळातील महान संत होते. आडकोजी महाराज हे त्यांचे गुरू. विदर्भात त्यांचा विशेष संचार असला तरी महाराष्ट्राभरच नव्हे तर देशभर हिंडून ते आध्यात्मिक, सामाजिक व राष्ट्रीय एकात्मतेचे प्रबोधन करीत होते. एवढेच नव्हे तर जपान सारख्या देशात जाऊन त्यांनी सर्वांना विश्वबंधुत्वाचा संदेश दिला. सन १९४२ च्या भारत छोडो आंदोलनादरम्यान काही काळ त्यांना अटक झाली होती. "आते है नाथ हमारे" हे त्यांनी रचलेले पद या काळात स्वातंत्र्यलढ्यासाठी स्फूर्तिगान ठरले होते.ग्रामगीतेच्या माध्यमातून त्यांनी गावाचा विकास, नैतिकता आणि सुसंस्कृत जीवनाचा मार्ग दाखवला आहे.देशात राष्ट्रीय एकात्मता निर्माण व्हावी यासाठी त्यांनी गावोगावी 'गुरुदेव सेवा मंडळा'ची स्थापना केली, ज्याद्वारे भजनाच्या माध्यमातून लोकांमध्ये सामाजिक व राष्ट्रीय एकात्मतेचे प्रबोधन केले राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे केवळ संत नव्हते, तर ते एक प्रगल्भ विचारवंत व देशभक्त होते. त्यांनी 'गावाचा विकास म्हणजेच राष्ट्राचा विकास' हा मुलमंत्र दिला. त्यांचे कार्य आणि विचार आजही ग्रामविकासासाठी प्रेरणादायी आहेत. तुकडोजी महाराज हे आधुनिक काळातील महान संत होते. संत तुकडोजी महाराजांचे कार्य संपूर्ण मानवतेसाठी आणि देशासाठी प्रेरणादायी आहे.या महान विभूतीची जोत ३१ ऑक्टोबर, १९६८ रोजी मावळली व संपूर्ण देश स्तब्ध झाला.अशा प्रकारे आपले संपूर्ण जीवन राष्ट्रहितासाठी समर्पित करून देशाला महत्वपूर्ण दिशा. त्यामुळे आज राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या कार्याचे सर्वांनीच अनुकरण करण्याची आवश्यकता आहे. आज बदलत्या हवामानामुळे,प्रदुषण,औद्योगिक, शहरीकरण, जंगलतोड,यामुळे निसर्गाचे संतुलन डगमगतांना दिसत असून पृथ्वी भयभीत आहे.यामुळे विदर्भासह संपूर्ण देशात सुर्य आग ओकतांना दिसतो देशातील काही भागात तापमान ४० अंश सेल्सिअसच्यावर आहे काही भागात ४६ अंश सेल्सिअस पर्यंत पोचले आहे. हा सर्वप्रकार पृथ्वीचे संतुलन बिघडल्यामुळे निर्माण



झालेली भयावह परिस्थिती आहे.आता राज्यासह देशातील अनेक भागात" एल निनो"मुळे पाणी टंचाई व दुष्काळाचे सावट निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. यापासुन बचावासाठी राज्यासह देशात मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड अत्यंत गरजेचे आहे.राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून राज्यासह देशातील जनतेनी मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड केली पाहिजे यामुळे हवामानाचे संतुलन स्थिर रहाण्यास मोठी मदत होईल आणि सर्वांना शुद्ध हवा, ऑक्सिजन, सावली व गुरांना चारा मिळेल आणि आपल्याला प्रत्येक झाडाच्या, पानात, फुलात,फळात,मुळात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे अवश्य दर्शन होईल. कारण संत तुकडोजी महाराजांचा सहवास सर्वात जास्त वृक्षांच्याच सानिध्यात रहाला आहे.त्यामुळे आजच्या दिवशी वृक्षलागवड करून राष्ट्रसंतांना नमन करू या.जय हिंद.



**■ लेखक रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**

## लोकजागर


### लोक सेवार्थ
### फुलपाखरांच्या संवर्धनासाठी ....

भारतीय उपखंडात सुमारे १,३०० पक्ष्यांच्या प्रजाती आणि ३७० सस्तन प्राण्यांच्या प्रजाती असल्या तरी, भारतीय फुलपाखरांची विविधता सुमारे १,५०१ असल्याचा अंदाज आहे. फुलपाखरांच्या विविधतेस असलेले प्रमुख धोके म्हणजे त्यांच्या अधिवासांचा नाश, ऱ्हास आणि विखंडन, चराई, वणवे आणि कृषी व शहरी परिसंस्थांमध्ये कीटकनाशके व तणनाशकांचा वापर.फुलपाखरे निसर्गाच्या अन्नसाखळीचा एक महत्त्वाचा भाग असल्याने, पर्यावरणीय संतुलनासाठी या प्रजातीचे संरक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे. हे लक्षात घेऊन, फुलपाखराचे महत्त्व आणि त्याच्या परिसंस्थेबद्दल लोकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी, तामिळनाडूच्या तिरुचिरापल्ली येथे 'ट्रॉपिकल बटरफ्लाय कॉन्झर्व्हेटरी तिरुचिरापल्ली' विकसित करण्यात आले आहे.

हे संवर्धनालय तिरुचिरापल्लीमध्ये कावेरी आणि कोल्लिडम नद्यांच्या दरम्यान असलेल्या अप्पर अनाईकट राखीव वनात वसलेले आहे. ते मेलूरपासून सुमारे ७ किलोमीटर अंतरावर असून २७ एकर परिसरात पसरलेले आहे. हे आशियातील सर्वात मोठे फुलपाखरू उद्यान मानले जाते.

या उद्यानात बाह्य तसेच अंतर्गत वनस्पतीगृह, 'नक्षत्र वनम' आणि 'राशी वनम' यांव्यतिरिक्त, असंघटित प्रजातींसाठी प्रजनन प्रयोगशाळा, एक खुले नाट्यगृह, एक ॲम्फिथिएटर, एक माहिती केंद्र, रोपवाटिका, सावलीगृहे, तलाव, कारंजे, प्रतिकृती, एक इको-शॉप आणि मुलांसाठी एक माहिती-मनोरंजन पार्क आहे.आतापर्यंत येथे फुलपाखरांच्या सुमारे १०९ प्रजातींचे निरीक्षण करण्यात आले आहे. अनुसूचित नसलेल्या फुलपाखरांच्या प्रजातींची अंडी गोळा करून, त्यांना हवेशीर प्लास्टिकच्या डब्यांमध्ये यजमान वनस्पतींची पाने खाद्य म्हणून देऊन, संस्थेतीलच उबवण प्रयोगशाळेत बंदिस्त वातावरणात त्यांचे प्रजनन केले जाते.

अळी (सुरवंट) आणि कोष (संक्रमण अवस्था) यांचे रूपांतर झाल्यानंतर, अखेरीस सुंदर रंगांचे प्रौढ फुलपाखरू बाहेर येते आणि या टप्प्यावर त्यांना नैसर्गिक अधिवासात सोडले जाते.वेळोवेळी, उद्यान प्रशासनाकडून अनियोजित फुलपाखरांच्या प्रजातींचे प्रजनन करून त्यांना त्यांच्या नैसर्गिक अधिवासात सोडले जाते. अनियोजित प्रजातींच्या प्रजननासाठी आणि फुलपाखरांवर देखरेख ठेवण्यासाठी, कीटकशास्त्राची पार्श्वभूमी असलेल्या एका कनिष्ठ संशोधन फेलोची नियुक्ती केली जाते.उद्यानाच्या प्रमुख ठिकाणी उभारलेले पाण्याचे कारंजे दिवसा फुलपाखरांच्या प्रजातींच्या गरजेनुसार थंड आर्द्रता निर्माण करण्यास मदत करतात. फुलपाखरे साधारणपणे सकाळी ९ ते ११ आणि दुपारी ३ ते ६ या वेळेत मकरंद गोळा करण्यासाठी सक्रिय आढळतात आणि या कीटकांची गरज भागवण्यासाठी पुरेशा प्रमाणात योग्य मकरंद वनस्पती लावण्यात आल्या आहेत. याशिवाय, अळ्यांसाठी यजमान वनस्पतींचीही काळजीपूर्वक निवड करून या पार्कमध्ये आवश्यक संख्येत लागवड करण्यात आली आहे आणि फुलपाखरांच्या वाढत्या संख्येचे आगमन हे याचेच द्योतक आहे.आता या उद्यानात वनस्पतींच्या २९८ प्रजाती आहेत.. भारतात आतापर्यंत ओळखल्या गेलेल्या १,५०१ फुलपाखरांच्या प्रजातींपैकी १०९ प्रजाती या उद्यानात आढळून आल्या आहेत. फुलपाखरे त्यांच्या अंगभूत, सौंदर्यविषयक, शैक्षणिक, वैज्ञानिक, पर्यावरणीय, आरोग्यविषयक आणि आर्थिक मूल्यांसाठी ओळखली जात असल्यामुळे, त्यांना सर्व प्राण्यांमध्ये सर्वात जास्त आवडणारे आणि प्रेरणादायी मानले जाते.फुलपाखरे वनस्पतींच्या





परागीभवनात महत्त्वाची भूमिका बजावत असल्यामुळे, जागतिक अन्नसाखळी त्यांच्या आरोग्यावर अवलंबून असते.हे उद्यान अशा प्रकारे तयार करण्यात आले आहे की, फुलपाखरांना नैसर्गिक वातावरणात प्रजनन, प्रजोत्पादन आणि त्यांचे जीवनचक्र पूर्ण करण्यासाठी पोषक वातावरण मिळावे. थोडक्यात सांगायचे झाल्यास, तिरुचिरापल्ली येथील उष्णकटिबंधीय फुलपाखरू संवर्धनालय हे केवळ जिल्ह्यातील लोकांसाठीच नव्हे, तर संपूर्ण देशासाठी एक वरदान आहे.

## शून्यातून विश्व
## यशोगाथा 'गोकुळ'ची

नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यातील शेणीत येथे सेंद्रिय शेती करणारे गोकूळ प्रकाश जाधव. त्यांनी कृषी विद्यापीठात उच्च शिक्षण घेऊन आपल्या मातीशी नाळ घट्ट ठेवली. शेतातच नव्या उमेदीने, नवसंकल्पनांसह काम करण्याचा त्यांनी निर्णय घेतला. नोकरीवर अवलंबून न राहता, आपल्या शेतात अनेक नवनवीन प्रयोग केले व त्यातूनच महिन्याकाठी एक ते दीड लाख रुपयांचे उत्पन्न ते घेत आहेत. गोकूळ यांचे प्राथमिक शिक्षण भगूर येथे झाले. पुढे यशवंतराव चव्हाण विद्यापीठातून पदवी पूर्ण केली. तसेच २०१२ मध्ये अर्थशास्त्रात 'बीए'चे शिक्षण पूर्ण केले. शेती हा त्यांचा वडिलोपार्जित व्यवसाय.यातूनच बालपणी त्यांना शेतीविषयी विशेष आवड निर्माण झाली आणि त्यातूनच पुढे कृषी शिक्षण घेण्याचे गोकूळ यांनी ठरविले.

शिक्षण पूर्ण झाल्यावर प्रारंभी त्यांनी शास्त्रोक्त पद्धतीने भाजीपाला, ऊस लागवडीला सुरुवात केली. दहा एकरमध्ये टोकन पद्धतीने सोयाबीनची यशस्वी लागवड, सहा वर्षांपासून शेडनेटच्या माध्यमातून ढोबळी मिरची, पॉलिहाऊसमध्ये रंगीत ढोबळी मिरची अशी प्रयोगशील शेती ते करत करीत आहेत. आजही भाजीपाल्यासंबंधी छोटेमोठे प्रयोग ते करत असतात. इगतपुरी तालुक्यात रब्बी हंगामात शेतकरी 'लोकवन', 'अजय ७२', 'अजित १०२' या गव्हाचे पारंपरिक पीक घेतात. त्यात खर्च अधिक आणि उत्पन्न मात्र अतिशय तुटपुंजे. पारंपरिक गहूचे उत्पन्न १५ क्विंटल इतके मिळते. मात्र, संकरित गव्हाच्या प्रयोगातून एकरी ३० क्विंटल इतके उत्पन्न मिळते. एका महिन्यांत पीक निघणार असून या नवीन प्रयोगातून १० ते १२ लाखांचे उत्पन्न अपेक्षित असल्याचे गोकूळ सांगतात.. मात्र, गोकूळ यांनी १५ एकर शेतीत संकरित जातीचा गहू पिकवला आहे. इगतपुरी तालुक्यात त्यांचा हा पहिलाच यशस्वी प्रयोग. फार काही वेगळे न करता त्यांच्या अभ्यासातून आणि निरीक्षणातून संकरित गव्हाची पेरणी पद्धत त्यांनी बदलली. तसेच खत, जलव्यवस्थापन यातही थोडा बदल केला. कृषी अधिकाऱ्यांसोबत चर्चा करून त्यांनी हवामानाचा अंदाज घेतला व त्यानुसार संक्रमित गव्हाचे पीक यशस्वीपणे घेतले. विशेष म्हणजे, पारंपरिक गव्हाच्या खर्चाएवढ्याच खर्चात संक्रमित गव्हाचे जास्त उत्पन्न त्यांनी घेतले. भविष्यात स्वत:च्या १५ एकरवर पिकवलेल्या गव्हाची व्यापाऱ्यांमार्फत विक्री न करता, थेट ग्राहकांना बाजारभावापेक्षा कमी दरात विकण्याचा मानस आहे.

तसेच गोकूळ हे तालुक्यातील शेतकऱ्यांना मोफत मार्गदर्शन करतात. त्यात पिकाची लागवड कशी करावी, कमी खर्चात उत्पादन कसे वाढवावे, याविषयी ते शेतकऱ्यांना आपल्या अनुभवांतून जागरूक करतात. वेळप्रसंगी अडचण आल्यास स्वखर्चाने शेतकऱ्यांच्या बांधावर भेट देऊन त्यांना वेळोवेळी योग्य मार्गदर्शनही करतात. तसेच, त्यांनाही शेतात कुठला नवीन प्रयोग करायचा असल्यास, ते कृषी अधिकारी व इतर प्रगतीशील शेतकऱ्यांचेही आवर्जून मार्गदर्शन घेतात व चर्चेतून निघालेल्या निकषावर निर्णय घेऊन प्रयोग करत असतात. उच्च शिक्षण घेऊनही आपल्या मातीशी एकरूप असलेल्या या तरुणाने शेतात अनेक नवनवीन उपक्रम केले आहेत. याची दखल कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापनाने घेऊन नुकताच 'आदर्श शेतकरी पुरस्कार'ही गोकूळ जाधव यांना जाहीर केला आहे.

**■ संकलन –संयोजन सुबोध रणशेवरे**

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

## बीड स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई

# आंतरराज्यीय अट्टल गुन्हेगार जेरबंद, अनेक गुन्हे उघड

बीड | प्रतिनिधी

शहरातील सुभाष रोडवरील 'श्री साई मोबाईल शॉपी' फोडणाऱ्या आंतरराज्यीय अट्टल गुन्हेगाराला जेरबंद करण्यात बीड स्थानिक गुन्हे शाखेला (LCB) यश आले आहे. या कारवाईमुळे पुणे ग्रामीण आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील चोरीचे गुन्हे देखील उघडकीस आले आहेत.

दिनांक १९ एप्रिल २०२६ रोजी रात्री ३:०० ते ३:५० च्या दरम्यान, चोरट्याने श्री साई मोबाईल शॉपीचे शटरचे कुलूप तोडून दुकानातील विविध कंपन्यांचे मोबाईल चोरून नेले होते. याप्रकरणी बीड शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०५(ए) आणि ३३१(४) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता.

■ असा लागला छडा -

स्थानिक गुन्हे शाखेने समांतर तपास सुरू केला असता, सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे महत्त्वाची माहिती मिळाली. गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीनुसार, हा गुन्हा कल्याण येथील सराईत गुन्हेगार रामनिवास मंजु गुप्ता (वय ३७ वर्ष) याने केल्याचे निष्पन्न झाले. या आरोपीवर महाराष्ट्र आणि गुजरात राज्यात ५० पेक्षा जास्त गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलीस तपासात समोर आली आहे.

■ दिवा येथून आरोपीला अटक -

पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक तयार करून ठाणे, मुंबई, गोवा आणि गुजरातमध्ये शोध मोहीम राबवण्यात आली. अखेर ठाणे जिल्ह्यातील दिवा (पूर्व) येथून आरोपीला शिताफीने ताब्यात घेण्यात आले. आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली असून चोरलेले मोबाईल त्रयस्त व्यक्तीला दिल्याचे सांगितले.

आरोपीच्या चौकशीतून अहमदनगर जिल्ह्यातील कोपरगाव येथील जिओमार्ट डिजीटल व मधु वाईन, तसेच पुणे ग्रामीण जिल्ह्यातील शिरूर येथील एस.एस. मोबाईल शॉपी फोडल्याचे गुन्हे देखील उघड झाले आहेत.

ही यशस्वी कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि शिवाजी बंटेवाड, पोउपनि सुशांत सुतळे, सोमनाथ गायकवाड, मारुती कांबळे, अर्जुन यादव, बाळू सानप, मनोज परजणे, अशफाक सय्यद, विकी सुरवसे आणि अतुल हराळे यांच्या पथकाने केली. आहे.





# जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये गुणवत्ता वाढीसाठी सकारात्मक प्रयत्न : सौ. संगीता पाटील

## काळमवाडी शाळेत शिवचित्र रंगभरण स्पर्धेचे बक्षीस वितरण

भाटवडे/प्रतिनिधी

संपूर्ण सांगली जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यासाठी सकारात्मक प्रयत्न सुरू आहेत. जिल्हा परिषदेच्या वतीने घेण्यात येत असलेल्या गुणवत्ता परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांच्या यशाचा आलेख वाढताना दिसत आहे. शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी शिक्षकांनी सातत्याने प्रयत्नशील राहावे, असे आवाहन सांगली जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा सौ. संगीता पाटील यांनी केले.

काळमवाडी तालुका वाळवा येथील जिल्हा परिषद शाळेत शिवचित्र रंगभरण स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी जिल्हा परिषद सदस्या श्रीमती संध्याताई पाटील होत्या. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांना अभिवादन करण्यात आले.

यावेळी पंचायत समिती सदस्य प्रकाश पाटील, सौ. सुप्रिया देवराज पाटील, रेठरे धरणचे सरपंच हर्षवर्धन पाटील प्रमुख उपस्थित होते. स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना शील्ड आणि प्रशस्तीपत्रे ग्रामपंचायत सदस्य उमेश सावंत, सौ. शितल रूपेश सावंत, सौ.अनिता प्रल्हाद सावंत, राजवीर ट्रेडर्सचे मालक वैभव सावंत यांच्या सौजन्याने देण्यात आली. २५१ विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. शिक्षकांचाही गौरव करण्यात आला.



यावेळी प्रकाश पाटील, हर्षवर्धन पाटील, सौ. सविता सावंत, दीपक रोकडे, सौ. पुनम सूर्यवंशी यांची भाषणे झाली. स्वागत मुख्याध्यापक सुरेश यटम यांनी केले. प्रस्ताविक दीपक रोकडे यांनी केले. आभार सचिन बामणे यांनी मानले. सूत्रसंचलन सुहास पाटील यांनी केले.

यावेळी सरपंच सौ. सविता सावंत, उपसरपंच स्वप्निल सूर्यवंशी, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अजित सावंत, माजी सरपंच शिवाजी सावंत, वसंत सावंत, माजी उपसरपंच प्रकाश सावंत, पोलीस पाटील सौ. संगीता वारे, ग्रामपंचायत सदस्य नामदेव सावंत, बापूसाहेब देसाई, आनंदा जाधव, उमेश सावंत, सौ. हौसाकाकी सावंत, सौ. शितल सावंत, सौ.अनिता सावंत, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य सुनील देवकर, सौ.पूनम सूर्यवंशी, सौ.रेखा सावंत, सौ.विद्या देसाई, सौ. निकिता लोहार, सौ. पूजा देवकर, शाळा व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष बजरंग सावंत, सामाजिक कार्यकर्ते सत्यजित वेटम, संजय केसरे, वैभव फाटक, सर्व शिक्षक, पालक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संयोजन शाळा व्यवस्थापन समितीने केले.

■ **फटाकेमुक्त अभियान स्तुत्य उपक्रम : हर्षवर्धन पाटील**

उपक्रमशील शिक्षक दीपक रोकडे सातत्याने विविध उपक्रम राबवत असतात. त्यांच्या संकल्पनेतून फटाकेमुक्त अभियान हा अभिनव उपक्रम गेली दोन वर्षे या शाळेत राबवला जात आहे. ध्वनी आणि वायु प्रदूषण टाळण्यासाठी या उपक्रमाची मोठी मदत होणार आहे. विद्यार्थ्यांना फटाक्यांकडून पुस्तक वाचनाकडे नेण्याचा खूप चांगला प्रयत्न या निमित्ताने होत आहे. हा उपक्रम सर्व शाळांनी राबवायला हवा, असे गौरव उद्गार रेठरे धरणचे लोकनियुक्त सरपंच हर्षवर्धन पाटील यांनी काढले.

# " आज देऊळगाव घाट मध्ये नृसिंह जयंती उत्सवाची भक्तिमय लगबग "

## पुरातन आणि दुर्मिळ मंदिरात उद्या भव्य सोहळा; पावसाळ्यात पर्यटकांचे आकर्षण ठरणारे शांत निसर्गस्थळ

देऊळगाव घाट - ठोंबरे बंधू

देऊळगाव घाट निसर्गाच्या कुशीत विसावलेले भक्तीच्या सुवासाने नटलेले एक छोटस गाव आहे. येथील नृसिंहगंगेच्या पवित्र संगमावर वसलेले श्री नृसिंहाचे जुने पुरातन मंदिर हे परिसरातील एक जागृत देवस्थान म्हणून ओळखले जाते. शतकानुशतके श्रद्धा आणि भक्तीचा दिवा अखंड प्रज्वलित ठेवणारे हे मंदिर आजही भाविकांच्या मनातील अढळ विश्वासाचे प्रतीक आहे. नदीकाठी विराजमान असलेले हे मंदिर म्हणजे जणू निसर्ग आणि अध्यात्म यांचा साक्षात संगमच..

आज साजऱ्या होणाऱ्या नृसिंह जयंती निमित्त मंदिर परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. फुलांची आकर्षक सजावट, दीपमाळांची रोषणाई आणि भक्तांच्या जयघोषाने परिसर दुमदुमणार आहे. संध्याकाळी ५ वाजता भजन-कीर्तन, त्यानंतर श्रींचा अभिषेक आणि महाआरतीचा भव्य कार्यक्रम पार पडणार आहे.

नृसिंह जयंती हा भगवान विष्णूंच्या चौथ्या अवतार असलेल्या नृसिंहाचा जन्मदिन मानला जातो. दरवर्षी वैशाख महिन्यातील शुक्ल पक्षाच्या चतुर्दशी तिथीला ही जयंती साजरी केली जाते. धार्मिक मान्यतेनुसार या दिवशी नरसिंहाची भक्तीभावाने पूजा केली तर आपल्या मनातील




भीती आणि नकारात्मक विचार कमी होण्यास मदत होते. तसेच यामुळे व्यक्तीमध्ये आध्यात्मिक शक्तीही वाढते. हा दिवस केवळ एका असुर आणि देव यांच्यातील युद्धकथेपुरता मर्यादित नसून, अढळ श्रद्धा आणि शेवटी सत्याचाच विजय होतो याची अमर साक्ष म्हणूनही ओळखला जातो.

निसर्गाच्या कुशीत विसावलेले हे मंदिर पावसाळ्यात विशेषतः अधिक देखणे भासते. देऊळगाव घाट येथील नरसिंह मंदिर केवळ एक धार्मिक स्थळ नसून, भविष्यात निसर्ग पर्यटनाचे तेजस्वी केंद्र ठरण्याची क्षमता बाळगून आहे.पावसाळ्यात वाहणारे पाणी, हिरवाईने नटलेला परिसर आणि शांत वातावरण यामुळे हे ठिकाण पर्यटकांसाठीही आकर्षणाचे केंद्र ठरते. येथे येणाऱ्या प्रत्येकला भक्तीची अनुभूती तर मिळतेच, पण निसर्गाच्या कुशीत विसरण्याचा अमूल्य आनंदही मिळतो.

ग्रामस्थ आणि भाविक भक्तांच्या संयुक्त प्रयत्नातून हा उत्सव अधिक मंगलमय होणार असून, सर्वांना या पवित्र सोहळ्यात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

"संगमात निसर्ग, मंदिरात श्रद्धा आणि मनात नृसिंहाचा वास," अशा भावनेने देऊळगाव घाट पुन्हा एकदा भक्तिरसात न्हाऊन निघणार आहे.

### पुरातन वैशिष्ट्यपूर्ण मंदिर

**“ नृसिंहगंगेच्या संगमावर वसलेले नृसिंह मंदिर जागृत देवस्थान म्हणून ओळखले जाते. हे मंदिर पुरातन आहे. शासणाने या मंदिर जिर्णोद्धाराकडे दुर्लक्ष केले आहे. शासणाने या ठिकाणी विकास केला तर एक पर्यटन स्थळ म्हणून नक्कीच नावारूपाला येऊ शकेल..**

**जयवंत रसाळ**

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे विचार आणि कार्य

३० एप्रिल हा दिवस महाराष्ट्राच्या संतपरंपरेतील एक तेजस्वी स्मरणदिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात आणि श्रद्धेने पाळली जाते. हा दिवस केवळ एका संताच्या जन्माचा उत्सव नसून, तो समाजजागृतीच्या, ग्रामविकासाच्या आणि मानवतेच्या मूल्यांच्या पुनर्स्मरणाचा दिवस आहे. तुकडोजी महाराजांनी आपल्या संपूर्ण जीवनकार्याद्वारे भारतीय समाजाला केवळ आध्यात्मिक उन्नतीचा मार्ग दाखवला नाही, तर सामाजिक परिवर्तन, राष्ट्रीय बांधणी आणि ग्रामविकासाची एक सशक्त संकल्पना प्रत्यक्षात आणली. त्यांच्या कार्यात अध्यात्म आणि समाजकार्य यांचा सुंदर संगम दिसून येतो. तुकडोजी महाराजांचा जन्म ३० एप्रिल १९०९ रोजी अमरावती जिल्ह्यातील यावली या लहानशा गावात झाला. त्यांचे बालपण अत्यंत साध्या आणि कष्टमय परिस्थितीत गेले. परंतु या परिस्थितीने त्यांना खचवले नाही, उलट त्यांच्यातील संवेदनशीलता, करुणा आणि समाजाविषयीची बांधिलकी अधिकच दृढ झाली. लहान वयातच त्यांना अध्यात्मिक ओढ निर्माण झाली आणि संतपरंपरेतील मूल्यांचा प्रभाव त्यांच्या मनावर पडला. त्यांच्या गुरूंच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी आध्यात्मिक साधना केली आणि त्यातूनच त्यांच्या जीवनाला एक स्पष्ट दिशा मिळाली.

तुकडोजी महाराजांचे व्यक्तिमत्त्व अत्यंत प्रभावी आणि बहुआयामी होते. ते केवळ संत नव्हते, तर ते एक उत्कृष्ट वक्ते, कवी, कीर्तनकार, समाजसुधारक आणि राष्ट्रप्रेमी होते. त्यांनी आपल्या ओजस्वी वाणीने




आणि सुलभ भाषेतून सामान्य जनतेपर्यंत आपले विचार पोहोचवले. त्यांच्या कीर्तनांमध्ये केवळ धार्मिक विषय नव्हते, तर सामाजिक समस्यांवर भाष्य करणारा आशय होता. त्यांनी अंधश्रद्धा, जातिभेद, अस्पृश्यता, अशिक्षण, व्यसनाधीनता यांसारख्या समस्यांवर कठोर शब्दांत टीका केली आणि समाजाला जागृत करण्याचा प्रयत्न केला. तुकडोजी महाराजांनी भजन-कीर्तनाला केवळ धार्मिक विधी म्हणून न पाहता, ते समाजजागृतीचे प्रभावी साधन बनवले. त्यांच्या कीर्तनांमध्ये लोकभाषेचा वापर असल्यामुळे ते सर्वसामान्य लोकांना सहज समजत. त्यांनी लोकांच्या मनातील अज्ञान, भीती आणि अंधश्रद्धा दूर करण्यासाठी सोप्या आणि प्रभावी पद्धतीचा अवलंब केला. त्यांच्या कीर्तनांमुळे अनेक लोकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडले आणि समाजात जागृती निर्माण झाली. त्यांच्या कार्यातील सर्वात महत्त्वाचा पैलू म्हणजे 'ग्रामगीता' हा ग्रंथ. ग्रामगीता हा केवळ धार्मिक ग्रंथ नसून, तो ग्रामविकासाचे तत्त्वज्ञान मांडणारा एक व्यापक आणि सखोल ग्रंथ आहे. या ग्रंथामध्ये त्यांनी आदर्श गावाची संकल्पना मांडली आहे. गावातील स्वच्छता, शिक्षण, आरोग्य, शेती, उद्योग, सामाजिक ऐक्य, नैतिक मूल्ये यांचा सखोल विचार त्यांनी ग्रामगीतेमध्ये मांडला आहे. त्यांच्या मते, गावाचा विकास म्हणजे देशाचा विकास. त्यामुळे प्रत्येक गाव स्वावलंबी, स्वच्छ आणि सुसंस्कृत असणे आवश्यक आहे.

ग्रामगीतेतील विचार आजच्या काळातही अत्यंत महत्त्वाचे आहेत. आजही ग्रामीण भागात अनेक समस्या आहेत. अस्वच्छता, अशिक्षण, बेरोजगारी, सामाजिक विषमता. या सर्व समस्यांवर उपाय म्हणून तुकडोजी महाराजांनी दिलेले विचार अत्यंत उपयुक्त ठरतात. त्यांनी ग्रामविकासाला एक सामाजिक चळवळ बनवण्याचा प्रयत्न केला. त्यांनी लोकांना आपल्या गावाच्या विकासासाठी स्वतः पुढाकार घेण्याचे आवाहन केले. तुकडोजी महाराजांनी स्वातंत्र्य चळवळीतही महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांच्या कीर्तनांमधून त्यांनी स्वातंत्र्याची जाज्वल्य भावना लोकांच्या मनात निर्माण केली. त्यांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध लोकांना प्रेरित केले आणि राष्ट्रीय चेतना जागृत केली. त्यांच्या कार्यामुळे त्यांना अनेक वेळा तुरुंगवास सहन करावा लागला. परंतु त्यांनी कधीही आपल्या ध्येयापासून माघार घेतली नाही. त्यांच्या राष्ट्रप्रेमाची भावना अत्यंत प्रखर होती.

स्वातंत्र्यानंतरही त्यांनी आपले कार्य थांबवले नाही. त्यांनी राष्ट्रनिर्माणाच्या कार्यात स्वतःला झोकून दिले. त्यांनी लोकांना स्वावलंबन, शिस्त, सामाजिक जबाबदारी आणि नैतिक मूल्यांचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी ग्रामीण भागातील लोकांना संघटित करून विकासाच्या कार्यात सहभागी केले. स्वच्छतेबाबत त्यांचे विचार अत्यंत प्रगत होते. त्यांनी 'स्वच्छ गाव, सुंदर गाव' ही संकल्पना रुजवली. त्यांनी स्वतः झाडू घेऊन गाव स्वच्छ करण्याचे कार्य केले. त्यांच्या या कृतीतून त्यांनी समाजाला एक महत्त्वाचा संदेश दिला. बदल घडवायचा असेल तर स्वतःपासून सुरुवात करावी लागते. त्यांनी लोकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले आणि स्वच्छतेला सामाजिक जबाबदारीचे रूप दिले.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(समाजशास्त्राचे अभ्यासक)**

तुकडोजी महाराजांनी शिक्षणाला विशेष महत्त्व दिले. त्यांच्या मते, शिक्षण हे समाजाच्या विकासाचे मुख्य साधन आहे. त्यांनी ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी प्रयत्न केले. त्यांनी लोकांना आपल्या मुलांना शिक्षण देण्यास प्रोत्साहित केले. त्यांनी नैतिक शिक्षणावर भर दिला आणि समाजात मूल्यांची जपणूक करण्याचा संदेश दिला. त्यांच्या विचारांमध्ये स्त्री-पुरुष समानतेचा स्पष्ट आग्रह दिसून येतो. त्यांनी स्त्रियांच्या शिक्षणावर आणि सक्षमीकरणावर भर दिला. त्यांनी समाजातील स्त्रियांना समान स्थान मिळावे यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या विचारांमुळे समाजात स्त्रियांविषयी सकारात्मक बदल घडून आले.

तुकडोजी महाराजांचे विचार हे अत्यंत व्यापक आणि सर्वसमावेशक होते. त्यांनी धर्म, जात, पंथ यांच्या पलीकडे जाऊन मानवतेचा विचार मांडला. त्यांच्या मते, सर्व धर्मांचा मूलभूत संदेश एकच आहे तो म्हणजे मानवतेची सेवा होय. त्यांनी समाजात बंधुभाव आणि ऐक्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला. आजच्या काळात तुकडोजी महाराजांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. वाढती भौतिकता, सामाजिक असमानता, पर्यावरणीय समस्या आणि नैतिक मूल्यांचा ऱ्हास या पार्श्वभूमीवर त्यांच्या विचारांची गरज अधिक तीव्रतेने जाणवते. त्यांनी दिलेला ग्रामविकासाचा आणि मानवतेचा संदेश आजही तितकाच उपयुक्त आहे.

तुकडोजी महाराजांच्या कार्याचा आणखी एक अत्यंत महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांनी ग्रामविकासाला केवळ आर्थिक किंवा भौतिक प्रगतीच्या चौकटीत न ठेवता त्याला एक सर्वांगीण आणि मूल्याधिष्ठित स्वरूप दिले. त्यांच्या दृष्टीने ग्रामविकास म्हणजे केवळ रस्ते, पाणी किंवा शेतीपुरते मर्यादित नव्हते, तर तो मानवी जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करणारा होता. त्यांनी ग्रामजीवनातील नैतिकता, परस्पर सहकार्य, सामूहिक जबाबदारी आणि आत्मसन्मान यांना विशेष महत्त्व दिले. त्यांच्या मते, जर गावातील प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या कर्तव्याची जाणीव ठेवून कार्य करेल, तर गाव आपोआप प्रगत होईल.

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
बीड, गुरुवार 30 एप्रिल 2026



# दलित शोषित वंचितांसाठी बाबासाहेबांनी समतेचा लढा उभारला - प्रा. टी.पी.मुंडे

## शिवसेना नेते प्रा. टी. पी. मुंडे यांच्या हस्ते निळ्या ध्वजाचे ध्वजारोहण संपन्न

## मांडेखेल येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची 135 वी जयंती उत्साहात साजरी!

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

"दलित, शोषित आणि वंचितांसाठी आशेचा किरण म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर. त्यांच्या विचारांमुळेच समाजाला नवी दिशा मिळाली असून, समतेचा लढा अधिक बळकट झाला आहे," असे प्रतिपादन शिवसेना नेते प्रा. टी. पी. मुंडे यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त मांडेखेल येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करून जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी प्रा. टी. पी. मुंडे यांच्या हस्ते निळ्या ध्वजाचे ध्वजारोहण संपन्न झाले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर प्रा. मुंडे यांनी आपल्या भाषणातून बाबासाहेबांच्या कार्याचा गौरव करत, "शिक्षण, संघटन आणि संघर्ष हा त्यांचा मूलमंत्र आजच्या पिढीसाठी अत्यंत मार्गदर्शक आहे. समाजात समता व न्याय प्रस्थापित करण्यासाठी प्रत्येकाने त्यांच्या विचारांचा अवलंब करणे आवश्यक आहे," असे आवाहन केले. या प्रसंगी गावच्या सरपंच शिवशल्या त्रिंबक मुंडे, नागापूर जिल्हा परिषदेचे सदस्य प्रदीप मुंडे, फुले आंबेडकरी अभ्यासक भगवान साकसमुद्रे यासह बौद्ध उपासक उपासिका तसेच गावातील ज्येष्ठ नागरिक महिला पुरुष युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# कडा येथील मौलाली बाबा यात्रेस संदल मिरवणुकीने दिमाखात सुरुवात; भाविकांची मोठी उपस्थिती

**आष्टी:प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील कडा येथील हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रतीक असलेल्या हजरत मौलाली बाबांच्या वार्षिक यात्रोत्सवास मंगळवारपासून मोठ्या उत्साहात आणि धार्मिक वातावरणात सुरुवात झाली. संदलची भव्य मिरवणूक, फटाक्यांची आतिषबाजी व जयघोषाने संपूर्ण कडा परिसर भक्तिमय झाला आहे.

यात्रेच्या मुख्य विधींना मंगळवारी रात्रीपासून सुरुवात झाली. रात्री १२ वाजल्यापासून ते पहाटेपर्यंत मौलाली बाबांच्या समाधीस पवित्र स्नान घालण्याचा विधी पार पडला. यावेळी सुगंधी द्रव्ये आणि गुलाबाच्या पाण्याने बाबांच्या समाधीला पाणी घातले .हा सोहळा पाहण्यासाठी स्थानिक भाविकांसह जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून भाविकांनी हजेरी लावली होती.

बुधवारी दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास मुख्य दर्ग्यापासून संदल मिरवणुकीस प्रारंभ झाला. या मिरवणुकीचे मुख्य आकर्षण म्हणजे हार-फुलांनी अत्यंत आकर्षकरीत्या सजवलेला घोडा आणि पारंपारिक वाद्यांचा गजरात निघालेला ताफा. मिरवणूक मार्गावर ठिकठिकाणी फटाक्यांची भव्य आतिषबाजी करण्यात आली, ज्यामुळे आकाशात रंगांची उधळण पाहायला मिळाली.

या धार्मिक सोहळ्यासाठी कडा परिसरातील राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय क्षेत्रातील



मान्यवरांनी हजेरी लावली. यात सरपंच युवराज पाटील, उपसरपंच दीपक कर्डीले, सभापती रमजान तांबोळी, ग्रामविकास अधिकारी बाळासाहेब थोरवे यांचा समावेश होता. यात्रेचे मानकरी शाम तिवारी, महेश पाटील, लखूनाना कर्डीले, मेहत्रे विकास, भीमराव पाटील यांनी यात्रेच्या नियोजनात महत्त्वाची भूमिका बजावली.

यावेळी माजी सरपंच अनिल ढोबळे, संभाजी कर्डीले, राम मधुरकर, राजबापू कर्डीले, अण्णासाहेब नाथ, सोनू तांबोळी, बाळासाहेब कर्डीले, संपत कर्डीले, बबलू पानसरे, बंडू सय्यद, संजय ढोबळे, पत्रकार रघुनाथ कर्डीले,बाळासाहेब निकम, छगन कर्डीले, अनिल शिंदे, महंमद सय्यद, दगडूभाई सय्यद, इब्बू सय्यद, अन्सार सय्यद यांच्यासह कडा ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.यात्रेनिमित्त कडा बाजारपेठेत मोठी उलाढाल होत असून, खेळणी, पाळणे आणि मिठाईच्या दुकानांनी रस्ते फुलून गेले आहेत. पोलीस प्रशासनाकडून चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला असून, यात्रा कमिटीच्या वतीने भाविकांच्या सोयीसाठी पिण्याचे पाणी आणि इतर आवश्यक सुविधा पुरवण्यात आल्या आहेत. ही यात्रा पुढील आठ दिवस चालणार आहे.

# ०१ मे पासून योगेश्वरीत महिला आत्मभान प्रशिक्षण शिबीर

**अंबाजोगाई प्रतिनिधी :-**

योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित योगेश्वरी क्रीडा प्रबोधिनी,श्रीमती कमल खुरसाळे स्मृती न्यास,स्वा.रा.ती. महाविद्यालय,श्रीमती गो.कु.यो.कन्या विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ०१ मे ते ०८ मे पर्यंत चालणाऱ्या महिला आत्मभान प्रशिक्षण शिबीराचे उद्घाटन ०१ मे रोजी श्रीमती गो कु यो कन्या विद्यालयात होत असून अध्यक्षस्थानी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर हे असून उद्घाटक म्हणून कोल्हापुर येथील लेखक समुपदेशक ऍड. प्रा.श्रीकांत माळकर उपस्थित राहणार आहेत. त्यांचे यशोगाथा जिद्दी व ध्येयवेड्या माणसांची याविषयावर व्याख्यान होणार आहे या शिबीरात शनिवार ०२ मे रोजी मुंबई डॉ. मधुबाला जोशी(चिंचाळकर) या अदभूत अंटार्क्टिका (अंटार्क्टिका संशोधन मोहिम ) विषयावर बोलणार आहेत शुक्रवार ०३ मे रोजी लातुर येथील सामाजिक कार्यकर्त्या आशा सरवदे(भिसे) ह्या महिला सक्षमीकरण



या विषयी मनोगत व्यक्त करतील ०४ मे सोमवार डॉ.अरूणा केंद्रे ह्या महिलांचे आरोग्य व बदलती जीवन शैली याविषयी भावना व्यक्त करतील तर मंगळवार ०५ मे ला सोलापुर येथील समीर गायकवाड हे वाचन घडविते सामाजिक वर्तन याविषयी तर बुधवार ०६ मे लातुर येथील सामाजिक कार्यकर्त्या सुनिता आरळीकर ह्या माझी आत्मकथार हिरकणीचं बिऱ्हाड या विषयी तर ०७ मे रोजी लातुरच्या ऍड.वैशाली लोंढे(यादव) महिलांची सुरक्षा आणि सामाजिक संस्था या विषयावर मत व्यक्त करणार आहेत ०८ मे रोजी शिबीराचा समारोप अप्पर जिल्हाधिकारी अश्विनी सोनवणे (जिरंगे) तसेच योगेश्वरी शिक्षण संस्थेचे सचिव कमलाकर चौसाळकर यांच्या उपस्थितीत होईल. या सर्व कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन यो.शि. संस्था,योगेश्वरी क्रिडा प्रबोधिनी,श्रीमती कमल खुरसाळे न्यास, स्वा.रा.ती. महाविद्यालय, श्रीमती गो.कु.यो.कन्या विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे.

# विद्यार्थ्यांनो ज्ञानसाधना करून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रगत समाजाचे स्वप्न साकार करा - डॉ.राजेश इंगोले

## आपेगाव येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त प्रबोधनपर व्याख्यान

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**

आजच्या स्पर्धात्मक युगात शिक्षणाशिवाय प्रगती शक्य नाही. समाजातील अनेक युवक अजूनही शिक्षणात मागे असल्याची खंत व्यक्त केली. विद्यार्थ्यांनी वर्षातील ३६४ दिवस शिक्षणासाठी देवून ज्ञानसाधना करावी, आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रगत समाजाचे स्वप्न साकार करावे असे आवाहन सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी केले.

तालुक्यातील आपेगाव येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमावेळी ते बोलत होते. आपेगाव येथे सकाळपासूनच गावात जयंतीचा उत्साह पाहायला मिळत होता. कार्यक्रमाची सुरूवात डॉ.बाबासाहेबांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सरपंच प्रशांत सरवदे , प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध व्याख्याते मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले, जयजित शिंदे, निलेश शिंदे, राजपाल काकडे, लक्ष्मण आचार्य, बळीराजे वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना डॉ.राजेश इंगोले यांनी विद्यार्थ्यांना स्वतः मध्ये सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करा असे सांगितले. ते पुढे म्हणाले की, शिक्षण हे केवळ नौकरीसाठी नसून व्यक्तिमत्त्व विकासासाठीही अत्यंत महत्त्वाचे आहे. डॉ.बाबासाहेबांनी आयुष्यभर शिक्षणाच्या जोरावरच, बुद्धिमत्तेचा वापर करून अन्यायाविरूद्ध लढा दिला आणि समाजाला नवी दिशा दिली. त्यामुळे विद्यार्थ्यांनी मोबाईल, मनोरंजन यापेक्षा अभ्यासाला अधिक वेळ देऊन स्वतःचे भविष्य घडवावे, एक दिवस जयंती दिनी भीम अनुयायी नाचूनच जयंती साजरी करतील पण इतर ३६४ दिवस वाचून साजरी करतील. शिक्षण घेऊन, ध्येय समोर ठेवून विद्यार्थ्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असलेली शासनकर्ती जमात बनण्यासाठी प्रयत्न करावा. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यानी संविधानाच्या रूपात समानते सोबतच आम्हांला आमच्यामध्ये सकारात्मक बदल घडवून आणून घेण्याची संधी दिली आहे. विद्यार्थ्यांनी क्रांतीची ही धगधगती ज्वाला आपल्या मस्तिष्कात कायम तेवत ठेवली पाहिजे असे सांगत जिथे अन्याय होतो त्या विरूद्ध संघर्षासाठी समाजाने सज्ज राहावे असे आवाहन डॉ.इंगोले यांनी केले. कार्यक्रमात विविध मान्यवरांनीही आपली मनोगते



व्यक्त करीत डॉ.बाबासाहेबांच्या विचारांचे स्मरण केले. त्यांच्या सामाजिक समतेच्या, बंधुत्वाच्या आणि शिक्षणाच्या विचारांचा अवलंब करण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांसह गावातील बहुसंख्य नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. जयंती उत्सव यशस्वी करण्यासाठी सचिन आचार्य, बालाजी आचार्य, अजय रोकडे, दीपक आचार्य, करण आचार्य, सुशिल आचार्य, रणजित शिंदे, माधन शिंदे, संघर्ष आचार्य, शंकर वाघमारे आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन आचार्य यांनी केले तर उपस्थितांचे आभार जयजीत शिंदे यांनी मानले.